## नि. क्र.२६४ च्या अर्जावरुन प्रतिवादी क्र. ३ ते ८ तर्फे साक्षीदार क्र. ५.

## मी शपथेवर कथन करतो की,

**नाव** – डॉ. स्मिता अशोक फर्नांडीस,

**वय** – ५९ वर्ष, **व्यवसाय** – डॉक्टर,

**राहणार**– सोमवार पेठ, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

## प्रतिवादी क्र. ३ ते ८ तर्फे सरतपास – श्री. एस. आर. पोवार, वकील.

**१.** मी १९९१ पासून वैद्यकीय व्यवसाय करते. मी १९९५ ते २०१६ पर्यंत आजरा ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. डॉ. अशोक सिमाँव फर्नांडीस माझे पती होते. आमचे १९९२ साली लग्न झाले होते. ते देखील वैद्यकीय व्यवसाय करत होते. तसेच ते आजरा ग्रामीण रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधिक्षक होते.

२. मी डॉ. अशोक एकत्र राहत होतो. दि. १.१२.२०२३ रोजी त्यांचे निधन झाले आहे. मी त्यांचे हस्ताक्षर व स्वाक्षरी ओळखते. मला त्यांचे हस्ताक्षर व स्वाक्षरी दाखवल्यास ओळखू शकते. आता मला दाखवलेल्या नि.क्र. २५५ च्या मृत्यू पत्रावरील वैद्यकीय प्रमाणपत्र माझ्या पतीच्या हस्ताक्षरातील असून त्यांची स्वाक्षरी असून ती मी ओळखते. साक्षीदाराने सदर बाब ओळखल्यामुळे प्रमाणपत्राला **नि.क्र. २६७** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

## प्रतिवादी क्र. २ तर्फे उलटतपास – श्री. व्ही. आर. पाटील, वकील.

**१.** नि.क्र. २६७ च्या प्रमाणपत्राच्या स्वाक्षरी खाली कोणाचेही नाव लिहिलेले नाही. त्यावरील शिक्कयावरती देखील प्रभारी वैद्यकीय अधिक्षक अशी बाब नमूद नाही. त्या शिक्कयावरती हाताने देखील प्रभारी असल्याची बाब नमुद नाही. मी माझे पती आजरा रुग्णालयात प्रभारी वैद्यकीय अधिक्षक होते याबाबतची कागदपत्रे सोबत आणलेली नाहीत.

**२.** मी आज माझ्या पतीचे हस्ताक्षर पडताळण्यासाठी त्यांच्या हस्ताक्षरातील इतर कागदपत्रे सोबत आणलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, वैद्यकीय

कायदयाप्रमाणे मृत्यपत्रावर प्रमाणपत्र दिल्याच्या नोंदी ठेवाव्या लागतात. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रमाणपत्रातील हस्ताक्षर व स्वाक्षरी माझ्या पतीचे असल्याचे मी खोटे सांगत आहे.

**<u>प्रतिवादी क्र. ९ ते १० तर्फे उलटतपास – श्री. एस. एम. देशपांडे, वकील.</u>**

**१. उलटतपास नाकारला.**

**<u>प्रतिवादी क्र. ११ ते १५ तर्फे उलटतपास – श्री. व्ही. बी. कड्डुकर, वकील.</u>**

**१.** वकील गैरहजर, प्रतिवादी क्र. ११ न्यायालयात हजर. त्याने उलटतपास घेण्यास नकार दिला. सबब, उलटतपास नाही.

**<u>वादी तर्फे उलटतपास – श्री. ए. एस. फराकटे, वकील.</u>**

**१.** वैद्यकीय प्रमाणपत्र दिलेल्या व्यक्तीची रजिस्टरला स्वाक्षरी घ्यावी लागते. वैद्यकीय अधिकारी रुग्णाच्या तपासणीचे रजिस्टर ठेवत असतात. त्यामध्ये तपासणीचा अहवाल लिहित असतात. मी न्यायालयाचे साक्षी समन्स मिळालेल्या नंतर माझ्या पतीने ठेवलेले रजिस्टर पाहिलेले नाहीत. नि.क्र. २६७ चे प्रमाण पत्र माझ्या पतीने ग्रामिण रुग्णालयात कार्यरत असताना दिलेले आहे. मी सद्या ग्रामिण रुग्णालय आजरा येथे कार्यरत नाही. मला केवळ हस्ताक्षर ओळखण्याबाबत बोलावलेले असल्यामुळे मी प्रमाणपत्राबाबतची कागदपत्रे सोबत आणली नाहीत.

**२.** हे म्हणणे खरे नाही की, तपासणी प्रमाणपत्रावरती तपासणी केलेल्या व्यक्तीची स्वाक्षरी घ्यावी लागते. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. २६७ च्या प्रमाणपत्रात ओळखीबाबत उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र. २६७ वरील हस्ताक्षर व स्वाक्षरी माझ्या पतीची असल्याचे निश्चितपणे सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ न्यायालयाचे समन्स आल्यामुळे खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १८.११.२०२५.

(आर. पी. थोरे)

**आजरा.**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.**